# ६) कम्म-परिणामो

'वसुदेवहिंडी' या ग्रंथाला जगभरातील कथासाहित्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थान आहे. इ.स.च्या सहाव्या शतकात संघदासगणी यांनी श्रीकृष्णाचे वडील वसुदेवाच्या प्रवासाचे वर्णन प्राकृत भाषेमध्ये केले आहे. हिंडी म्हणजे हिंडणे, प्रवास. म्हणून या ग्रंथाचे नाव वसुदेवहिंडी होय. या ग्रंथात वसुदेवाच्या प्रवासासोबत कौरव-पांडव यांची कथासुद्धा संक्षिप्त स्वरूपात दिलेली आहे. हा ग्रंथ २ खंडांमध्ये विभागला असून या ग्रंथाचा दुसरा खंड धर्मदासगणी यांनी रचला आहे. या ग्रंथामध्ये मोठ्या प्रमाणात तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. याचसोबत या ग्रंथामध्ये विविध विषयांवरील अनेक कथा आलेल्या असून या कथा अत्यंत रोचक आणि उपदेशप्रद आहेत.

कर्मांचा परिणाम दाखवणारी प्रस्तुत कथा देखील या कथांप्रमाणेच रोचक आणि उपदेशप्रद आहे. माणसाला त्याच्या आसक्तीचे कसे फळ मिळते हे या कथेत मांडलेले आहे.

अत्थि मगहा णाम जणवओ। तस्संतिए पलासगामो णाम गामो। तत्थ कोंकणओ णाम एगो माणुसो परिवसइ। तेण य खेत्तब्भासे समिरुक्खो रोविओ। तत्थ य तेण देवया ठविया। सो य माणुसो वरिसे वरिसे तम्मि देवयाए रुक्खमूले बंभण-किवण-वणीमगाणं पभूयमण्ण-पाणं देइ, छगलं च णिवेदेइ। एवं च सो कालेण बहुएण कालगओ। तओ गिद्ध-गढिअ-मुच्छिअ-अज्झोववण्णो तव्वत्तियाए य तिरिक्खजोणियणिव्वत्तियाउओ अप्पणो चेव घरे छगलियापुत्तो जाओ।




ततो केणइ कालंतरेण तस्स पुत्तेहिं 'अम्हाणं उवरओ ताओ' त्ति काऊणं भोयणं सज्जावियं। ततो ते मित्त-बंधवसहिया उवाइउं जइउं गया। छगलो वि य मंडेउं तत्थेव णीओ। गंध-पुप्फ-मल्ल-पूयाविसेसेण य अच्चिया देवया। घरमहत्तरएहिं च भणियं- छगलओ उवणिज्जउ। ततो तस्स पुत्तो देवयदिण्णो णाम छगलयं आणेउं गओ। सो य तं गलए बंधिऊण बेबयंतं आणेइ।

तेण य समएणं समणा समियपावा साहुजोग्गदेसभाए रुक्खाभासे वीसमंति। सो य तेण पएसेण आणिज्जइ। तओ अइसयसमावण्णेणं तत्थ साहुणा भणिओ-

सयमेव य रुक्ख रोविए,अप्पणियाए वितड्डि कारिया।
उवाइयलद्धया य से, किं छगला! बे वि त्ति वाससे?।।

तं च साहुणो वयणं तस्स पुत्तेण सुयं। सो य छगलओ तुण्हिक्को ठिओ । ततो से पुत्तो साहुसगासे उवगंतूण भणइ- 'किं भयवं ! तुब्भेहिं एस छगलओ भणिओ जेण तुण्हिक्को ठिओ?' तओ तेण साहुणा अणलियवयण-परमत्थेण भणिओ- 'देवाणुप्पिया ! एस छगलओ तुब्भं पिया भवइ। एयं तुब्भं साहइ- अहं ते पिया, मा मं मारेह त्ति। तुब्भे ण परियच्छह।' तओ तेण कोंकणअपुत्तेण साहू भण्णइ- 'किह पुण अम्हेहिं पत्तियव्वं ? जहा एस अम्हं पिया भवइ' त्ति। तओ सो साहू पुव्ववुत्तंतं साहइ, सहेउयं सकारणं



साभिण्णाणं से परिकहेइ।

तओ से पुत्तो तद्दरिसाविओ पायवडिउट्ठिओ य, तेसिं भाउयाण सव्वं जहाभूअत्थं साहइ। तओ ते परमविम्हय-समावण्णा साहुणो पायमूलं गंतूणं वंदिऊण, मित्त-बंधव-सयण-परियण-सहिया सव्वे संवेगसमावण्णा सीलव्वयाइं घेत्तूण छगलयं च सघराइं गया। छगलओ वि साहुपसाएण मुक्को। ताणं चिय तप्पभिइं अरहंतदेवया, साहुणो य दक्खिणेया।

तं एयं जहा तेणं कोंकणएणं सयं-कयकम्म-विवागजणियं दुक्खं संसारो य संपत्तो एवं तुमए वि अप्पणो पुत्तो सयमेव संसारमहाकडिल्ले छूढो।

## सद्दत्था

**मगहा** – मगध नावाचे राज्य, ज्याला सध्या बिहार राज्य म्हणून ओळखले जाते.
**जणवओ** – जनपद, राज्य
**तस्संतिए** – त्याच्या आत, जवळ
**पलासगामो** – पलाशग्राम नावाचे गाव
**कोंकणओ** – कोंकणक नावाचा एक माणूस
**खेत्तब्भासे** – शेताजवळ
**रोविओ** – लावला, रोवला
**ठविया** – ठेवली
**वरिसे वरिसे** – दरवर्षी
**पभूयं** – भरपूर, प्रभूत
**छगलं/छगलयं** – बोकडाला
**णिवेदेइ** – नैवेद्य दाखवत असे, बळी देत असे
**कालगओ** – मरण पावला
**गिद्धगढिअमुच्छिअअज्झोववण्णो** – आसक्त, रत, मोहित, त्याच विचारात गढलेला तो
**तिरिक्खजोणियणिव्वत्तियाउओ** – तिर्यंच (पशुपक्ष्यांच्या) योनीत जन्माला आलेला
**उवरओ** – निधन झाले (म्हणून)
**सज्जाविअं** – तयार करविले
**उवाइउं जइउं** – नवस फेडण्यासाठी
**घरमहत्तरएहिं** – घरातल्या मोठ्या माणसांनी
**उवणिज्जउ** – जवळ आणावे
**देवयदिण्णो**– देवदत्त (नावाचा)
**बेबयंतं** – बें बें आवाज करीत
**समियपावा** – ज्यांची पापे शमन झाली आहेत असे
**साहुजोग्गदेसभाए** – साधूंना बसण्यास योग्य अशा जागी
**रुक्खाभासे** – झाडाच्या जवळ
**वीसमंति** – विश्रांती घेत होते
**अइसयसमावण्णेणं** – अतिशय (ज्ञान) मिळवल्याने, आत्मज्ञान चांगल्या प्रकारे मिळवल्यामुळे
**अप्पणियाए** – स्वतःच
**वितड्डि** – पार (देवासाठी बांधलेला)
**उवाइयलद्धया** – नवसाने प्राप्त
**वाससे** – (बें बें असे का) बोलत आहेस ?
**तुण्हिक्को** – शांत झालेला, मौन धारण केलेला
**साहुसगासे** – साधूंच्या जवळ
**उवगंतूण** – जवळ जाऊन
**अणलियवयणपरमत्थेण** – खोटे न सांगता सद्भावाने
**साहइ** – सांगत आहे
**ण परियच्छइ** – ओळखले नाही
**पत्तियव्वं** – (आम्ही कसा) विश्वास ठेवावा
**साभिण्णाणं** – खाणाखुणांसहित
**तद्दरिसाविओ** – ते दाखवलेला
**पायवडिउट्ठिओ** – पाया पडून उठला
**जहाभूअत्थं** – जसे घडले तसे
**संवेगसमावण्णा** – विरक्ती प्राप्त झालेले
**सीलव्वयाइं** – शीलव्रते इ. नियम (सदाचरणाचे नियम) (येथे शीलव्रते म्हणजे जैन तत्त्वज्ञानानुसार ५ अणुव्रते, ३ गुणव्रते व ४ शिक्षाव्रते असे एकूण १२ नियम अभिप्रेत आहेत)
**तप्पभिइं** – तेव्हापासून
**अरहंतदेवया** – तीर्थंकर, अत्यंत पूजनीय असे देव
**दक्खिणेया** – ते पूजनीय / वंदनीय झाले (त्यांना दक्षिणा दिली जाऊ लागली)
**सयं-कयकम्मविवागजणियं** – स्वत: केलेल्या कर्मांच्या परिणामातून निर्माण झालेले
**संसारमहाकडिल्ले** – संसाररूपी घनदाट अरण्यात
**छूढो** – सोडले आहे

## सज्झाओ

**१) माध्यम भाषेत भाषांतर करा.**

१) अत्थि मगहा ...... छगलियापुत्तो जाओ।
२) तओ से पुत्तो ...... दक्खिणेया ।
३) ततो केणइ ...... बेबयंतं आणेइ।
४) तं च साहुणो ...... पिया भवइ त्ति ।

**२) उत्तरे लिहा.**

१) कोंकणकाच्या कर्माचा परिणाम सांगा.
२) साधूने बोकडाला केलेल्या मदतीचे स्वतःच्या शब्दात वर्णन करा.
३) वडिलांच्या मृत्यूनंतर मुलांनी दिलेल्या गावजेवणाचे वर्णन करा.

**३) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

१) किं छगला! बे वि त्ति वाससे?
२) देवाणुप्पिया! एस छगलओ तुब्भं पिया भवइ।

**४) कारणे लिहा.**

१) कोंकणकाला तिर्यंच योनीत बोकडाचा जन्म मिळाला, कारण
२) बोकडाची साधूच्या कृपेने मुक्तता झाली, कारण

**५) चौकटी पूर्ण करा.**

१) मगहो जणवए ठिओ गामस्स णाम- ☐
(पलासगामो/धुंधओ गामो)
२) कोंकणअस्स बीओ जम्मो - ☐
(वाणरस्स/छगलअस्स)
३) छगलं वहाओ मुक्तो जणो - ☐
(मित्तो/साहू)

**६) रूपे ओळखा.**

१) काऊणं -
२) उवणिज्जउ -
३) गतो -
४) आणेइ -
५) ठितो/ठिओ -
६) घेत्तूण -

**७) समास सोडवा.**

१) बंभणकिवणवणीमगा -
२) मित्तबंधवसयणपरियणा -
३) खेत्तब्भासे -
४) णरणारीओ -

**८) समास ओळखा.**

१) अण्णपाणं -
२) अहोरत्तं -
३) इत्थीपुरिसा -

**९) समास करा.**

१) वरिसे-वरिसे -
२) जहा आउयं तहा -
३) लाभो वा अलाभो वा -
४) जाव जीवो ताव -

**१०) प्राकृत समानार्थी शब्द लिहा.**

१) जणवओ -
२) अब्भासो -
३) मित्तो -
४) बंधवा-

**११) प्राकृत विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१) किवण -
२) वणीमग -
३) तुण्हिक्क -
४) दुक्ख -

**१२) या पाठाबद्दल तुमचे मत/विचार मांडा.**